क्रमांक/प्रअ/शेविक/कावि/५१/२०१६
जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ
दिनांक: ५ जुलै, २०१६

परिपत्रक:

**विषय:- ग्रामस्तरीय कृषी आणि पशुसंवर्धन समितीची स्थापना करणेबाबत**

ज्याअर्थी माझे असे निदर्शनास आले आहे कि, गावपातळीवर कृषी अथवा पशुविभागासंबंधी कुठलीही समिती नाही. यामुळे शेतकरी तसेच सामान्य जनता यांच्या प्रश्नांना योग्य न्याय गावात मिळत नसल्याचे दिसुन येते. म्हणुन मी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी तथा अध्यक्ष, बळीराजा चेतना अभियान समिती, यवतमाळ मला मिळालेल्या अधिकारांचा वापर करून प्रत्येक महसुली गावामध्ये ग्रामस्तरीय कृषी आणि पशुसंवर्धन समितीची स्थापना करावी असे आदेश पारित करीत आहे. या समितीचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल.

**समितीचे नाव:-** ग्रामस्तरीय कृषी आणि पशुसंवर्धन समिती

**समितीचे कार्यक्षेत्र:**:- सदर समितीचे कार्यक्षेत्र महसुली गाव असेल.

**समितीचे सदस्य**:- या समितीमध्ये खालीलप्रमाणे सदस्य असतील.

१. अध्यक्ष:- सरपंच
२. सचिव:- ग्रामसेवक
३. सदस्य:- -

- कृषी सहाय्यक,
- पोलीस पाटील,
- पशुधन विकास अधिकारी/सहाय्यक पशुधन विकास अधिकारी/ पशुधन पर्यवेक्षक,
- विज वितरण विभागाचे प्रतिनिधी,
- विविध कार्यकारी सोसायटीचे सचिव,
- गावातील प्रगतीशिल शेतकरी (दोन),
- महिला बचत गटाचे प्रतिनिधी (दोन).

असे मिळुन ११ लोकांची हि समिती असेल.

<u>समितीची कार्ये</u>:-

१. कृषी संबंधी नाविण्यपूर्ण उपक्रम गावस्तरावर हाती घेणे.
२. शेतक-यांची कृषी केंद्र चालकाकडुन बी- बियाण्यांबाबतीत फसवणुक होऊ नये म्हणुन कृषी केंद्रांवर लक्ष ठेवणे.
३. कृषी उत्पादनाचा तसेच विपणनाचा गावस्तरीय आराखडाडा तयार करणे.
४. मनरेगा अंतर्गत जलसंधारणाच्या कामाचे नियोजन करणे, पांदण रस्त्याचे प्रस्तावाचा पाठपुरावा करणे.
५. हंगामपूर्व प्रशिक्षणाचे आयोजन करणे.
६. पिक पद्धतीबद्दल शेतक-यांना मार्गदर्शन करणे.
७. गावात शेतक-यांना लागणारे बी- बियाणे, खते यांची उपलब्धता पाहुन पुर्तता होईल याची दक्षता घेणे.
८. गावपातळीवर पतपुरवठ्याचे नियोजन करणे.
९. नैसर्गिक आपत्तीचे प्रसंगी नियोजन करणे तसेच प्रसंग आल्यास परीस्थितीचे पंचनामे करण्यास सहकार्य करणे.
१०. कै. गोपीनाथ मुंढे शेतकरी अपघात विमा योजनेचे प्रस्ताव शेतक-यांकडून भरले जातील याची दक्षता घेणे.
११. पिक विमा योजनेचे प्रस्ताव सर्व शेतक-यांकडून भरले जातील याची काळजी घेणे व मार्गदर्शन करणे.
१२. बचत गटामार्फत विविध कृषी प्रक्रीया उद्योगाला चालना देणे.
१३. वन्यप्राण्यांकडुन झालेल्या नुकसानीसाठी प्रस्ताव दाखल करण्यास मार्गदर्शन करणे.
१४. गावागावात कृषी प्रदर्शनी आयोजित करणे, प्रशिक्षणे व शेतीशाळा घेणे.
१५. आपात्कालीन परिस्थितीमध्ये पिकांचे नियोजन करण्यासाठी मार्गदर्शन करणे.
१६. गावाचा शेतकरीनिहाय तसेच पिकनिहाय पेरणी अहवाल तयार करणे.
१७. जनावरांच्या लसीकरणाचे कार्यक्रम घेणे व मार्गदर्शन करणे.
१८. निकृष्ठ जनावरांची अनुवांषिकता वाढविणेसाठी कृत्रिम रेतनाची माहिती गावक-यांना देणे.
१९. वैरण विकासाच्या योजनेची माहिती देणे.
२०. कृषी तसेच पशुसंवर्धन·विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या विविध योजनांची माहिती देणे व मार्गदर्शन करणे. ईत्यादी

**समितीची बैठक**:- या समितीची बैठक दर महिन्यातुन एकदा होईल. हि बैठक समितीचे सचिव आयोजित करतील.बैठकीनंतर इतिवृत्त लिहिण्याची जबाबदारी समितीच्या सचिवाची असेल. तसेच समितीची सर्व कागदपत्रे, इतिवृत्त, अहवाल इत्यादी जतन करण्याची जबाबदारी सचिवाची असेल. बैठकीचा अहवाल, सभेचा दिनांक, उपस्थित सदस्य व घेतलेले विषय इत्यादी बाबी नमुद करुन बैठक झाल्याचे ७ दिवसाचे आत संबंधित तहसिलदार कार्यालय येथे सादर करावे.

(सचिन्द्र प्रताप सिंह)
जिल्हाधिकारी, यवतमाळ